REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2018

# धम्मचक्रप्रवर्तित सम्राट अशोकाची समाजाभिमुख प्रशासकीय कामगिरी

प्रा. डॉ. संजीव पगारे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय,
मेराणे, ता.जि.धुळे.

## प्रास्ताविक :–

भारतवर्षाच्या इतिहासात हीमपर्वतांच्या उंचशिखराच्या उंचीची उपमा सम्राट अशोकाच्या कार्याला प्रदान करण्यात येते. या देशाच्या पौराणिक राजकीय आणि सामाजिक वाटचालीत अनेक राजे–महाराजांचा उल्लेख वाचावयास मिळतो. यात राजा इक्ष्वाकू, राजा रामचंद्र, राजा हरिश्चंद्र, युधिष्ठिर सारख्या आदर्श, सत्य आणि एकवचनी नृपतींचा उल्लेख प्रामुख्याने घेतला जातो. मात्र त्यांची ऐतिहासिकता ही वादग्रस्त आहे. कारण पौराणिक कथांचा अपवाद वगळला तर त्यांच्या कारकीर्दीवर प्रकाश टाकण्यासाठी कोणतीच ऐतिहासिक साधने उपलब्ध नाहीत. या पार्श्वभूमीवर जर आपण विचार केला तर सम्राट अशोकाने आपल्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक विशेष म्हणजे बौद्ध धम्माचा स्वीकार, प्रचार आणि प्रसाराच्या वाटचालीचा सत्येतिहासच स्तंभालेख, गुहांमधील लेख, बौद्ध स्तूप–विहार यांच्या माध्यमातून समाजासमोर आणला आहे. म्हणूनच कॅनिंग हॅम, व्हिन्सेंट स्मिथ, पंडित के. कृष्णशास्त्री, राजेंद्रलाल मित्रा, डॉ. रोमिला थापर सारख्या देशी–विदेशी संशोधकांना सम्राट अशोकाचे वास्तव चरित्र आणि कार्य सम्यकतेने मांडता आले. त्यातूनच सम्राट अशोकाचा महापराक्रम, केलेला साम्राज्यविस्तार, राज्यपद्धती, प्रजेचा त्राता, सर्वश्रेष्ठ बुद्धाचा अनुयायी इत्यादी बाबींची थोरवीची जाण समाजाला झाली.

## मौर्य साम्राज्याचा अधिपती (सम्राट)

मगध येथे बिंबिसार पुत्र अजातशत्रूने आपले राज्य स्थापन करून इ. स. पूर्व 546 मध्ये गंगा आणि शोण नद्यांच्या संगमावर अजिंक्य आणि विलोभनीय किल्ला बांधून सभोवती सुंदर नगर वसविले. हेच नगर पुढे मगध राज्याच्या राजधानीचे शहर पाटलीपुत्र म्हणून प्रसिद्धीस आले. पुढे अनेक वर्षांच्या घडामोडीनंतर मगध राज्यावर नंदवंशाच्या राजवटीचा शेवट करून चंद्रगुप्त मौर्याने आपले वर्चस्व प्रस्थापित केले. चंद्रगुप्ताने 24 वर्ष राज्यकारभार पाहून राज्याचा विस्तार घडवून आणला. पुढे मात्र आपला पुत्र बिंदुसारला गादीवर बसविले. बिन्दुसारने महापराक्रमाने अफगाणिस्तानपर्यंत आपल्या राज्याचा विस्तार करून विरोधकांवर वचक निर्माण केला. पुढे बिन्दुसारच्या सर्व उत्तर अधिकाऱ्यांचा विरोध मोडून अशोकाने आपले राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले.[1] अवघ्या वयाच्या 21 व्या वर्षी अशोक हा मौर्य साम्राज्याचा सम्राट बनला. सर्व विरोधकांचा पाडाव झाला म्हणून इ. स. पूर्व 268 मध्ये त्याने स्वतःला राज्याभिषेक करून घेतला.

## धम्मचक्र प्रवर्तित सम्राट अशोक :–



सम्राट अशोकाने मौर्य साम्राज्याचे सर्व विरोधकांचे पारिपत्य करून आपले साम्राज्य अबाधित केले असले तरी ओरिसा प्रांतात महानदीच्या भागात कलिंग हे एक संपन्न राज्य होते. तेथील स्वाभिमानी शूर व पराक्रमी लोकांनी मौर्यांच्या सार्वभौमत्वाला विरोध करून आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवले होते. सम्राट अशोकाने इ. स. पूर्व 261 मध्ये कलिंगवरची स्वारी हाती घेऊन अफाट सैन्यासह चालून गेला. कलिंगच्या राजा खारवेलने प्रचंड विरोध केला. मात्र सम्राट अशोकाच्या अफाट सैन्यापुढे त्याचा निभाव लागला

नाही. एक लाख सैन्य ठार मारले गेले तर दीड लाख सैन्य युद्धबंदी बनून अशोकाला प्रचंड विजय मिळाला. असे असले तरी रणांगणावर झालेला संहार आणि रक्तपात पाहून अशोकाला तीव्र वेदना आणि कमालीचा पश्चाताप झाला. मानसिकतेने खचलेल्या अशोकावर राजवैद्यांच्या कोणत्याच औषधांची मात्रा उपकारक ठरत नव्हत्या.[2]

पश्चातापाने होरपळलेल्या अशोकाने बौद्धानुयायी आचार्य उपगुप्तांच्या वचनांचा स्वीकार केला. एवढेच नव्हे तर उपगुप्तांच्या वाणीने प्रसन्न झालेल्या अशोकाने राजधानीतच एक कृत्रिम गुहा बनवून त्याभोवती सुंदर वन तयार करून घेतले. तेथेच आचार्यांचा निवास राहिला. त्या ठिकाणी नित्यनियमाने अशोक येत असे. आचार्यांची उपदेश व प्रवचने यातून सम्राट अशोकाला सत्संग लाभला. यातून सम्राट अशोक बुद्ध धम्माकडे आकर्षित होऊन बौद्ध धम्माचा स्वीकार केला. आचार्यांच्या मार्गदर्शनाखाली तथागत भगवान गौतम बुद्धांच्या पवित्र स्थळांना भेटी दिल्यात. बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसाराच्या कार्याला वाहून घेतले.[3]

सम्राट अशोकाने आपल्या राजकीय वाटचालीतून जरी बौद्ध धम्माचा स्वीकार केला असला तरी तो बौद्ध धम्माचा एक प्रामाणिक अनुयायी बनला होता. कारण त्याने इ. स. पूर्व 248 मध्येच लुम्बिनीवन या गौतम बुद्धाच्या जन्म स्थळास भेट दिली होती. एवढेच नव्हे तर एकाच वेळी 84,000 स्तूप बांधण्यात यावेत अशी ही इच्छा होती. यावरूनच सम्राट बुद्ध धम्माचा किती कट्टर अनुयायी बनला होता याचा प्रत्यय येतो. सम्राट अशोकाच्या व्यक्तीमत्वाला चक्रवर्तित या संकल्पनेचा संबंध जोडला जातो. चक्रवर्तित या शब्दाचा तात्विक भाषेत संबंध राजकीय आणि प्रादेशिक सत्ताधाऱ्यांशी जोडला जातो. या संकल्पनेशी ज्या प्रतिमेचा संबंध येत असतो ती प्रतिके सप्तरत्ने म्हणून ओळखली जातात. अशी प्रतिके म्हणजेच संपूर्ण विश्वावर वर्चस्व किंवा सत्ता असलेली म्हणून चक्र, भाग्यदेवता, राणी, युवराज, मंत्री, सम्राटाचा हत्ती आणि घोडा अशा सप्तरत्नांचा समावेश होतो. महत्त्वाचे म्हणजे लीनभाव आणि मानवतावादाचा समुच्चय अशोकाच्या व्यक्तीमत्वामधून प्रकर्षाने जाणवतो. याची प्रचिती आपल्याला त्याच्या शिलालेखांच्या अभ्यासातून येत असते. एक राज्यकर्ता आणि सामान्य माणूस म्हणून बौद्ध धम्माची व्यावहारिक महत्त्वाची बाजू सम्राट अशोकाच्या लक्षात आली होती. म्हणूनच राजा हा राज्याचा सेवक असून जनतेकडून आलेला कर हा त्याचा हिस्सा असतो, हे पारंपारिक तत्वज्ञान अशोकाने बाजूला ठेवले. स्वतःला जनतेकडून नियुक्त करण्यात आलेला एक थोर मनुष्य ऐवजी सम्राट अशोक जनतेचा पिता समजत असे. म्हणजेच प्रजा व राजा यांच्यातील संबंध पिता–पुत्र सारखा असावा. याचाच तो नेहमी आग्रह धरीत होता.

''सव्वे मुनिस्से पजा ममा. अथा पजाये इच्छामि हकं किंति सव्वेन हितसुखेन हिद लोकिकपाल लोकिकेन युज्जेवुति तथा..... मुनिस्सेसु पि इच्छामि हकं.....''

'म्हणजेच सर्व प्रजाजन माझी लेकरे आहेत आणि ज्याप्रमाणे माझ्या मुलांनी इहलोकी आणि परलोकी कल्याण व सौख्य साधावे, असे मी इच्छितो. त्याप्रमाणेच सर्व माणसांच्या बाबतीतही माझी इच्छा आहे.'[4]

हा राजा आणि प्रजा यांच्यात जो पितृवत्सला पणा हवा असतो ती पितृवत्सल वृत्ती सम्राट अशोक यांच्या व्यक्तिमत्त्वात होती. म्हणूनच त्यांच्या व्यक्तिमत्त्वात चक्रवर्तित राजा प्रतिबिंबित होतो.

## प्रजावत्सल राज्यकर्ता :–

### 1) आदर्श राज्यपद्धती :–

आपल्या राज्यात धर्म शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार व्हावा याकडे सम्राट अशोकाने विशेष लक्ष दिले होते. अर्थात धर्म शिक्षणाबरोबरच राज्यात राजाचे कर्तव्य काय असतात त्याकडे त्याने दुर्लक्ष होऊ दिले नाही. आपले राज्य आणि राज्यकारभार हा अधिकाधिक समाजाभिमुख कसा असेल याकरिता सम्राट अतिशय दक्ष राहात असे. याकरिता आचार्य चाणक्य उर्फ कौटिल्य यांनी लिहिलेला राजनितीपर 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ त्यांचा आदर्श होता. म्हणूनच मौर्यकालीन विशेषता अशोकाच्या काळातील राज्यपद्धती ही प्रजेच्या हिताकरिताच होती असे आपणास त्यांच्या शिलालेखांच्या अभ्यासावरून दिसून येते. अफगाणिस्थान सुद्धा अशोकाच्या साम्राज्यात सामील होते. आजही तेथील भग्न अवस्थेत असलेले अशोककालीन स्तंभ आणि बौद्ध स्तूप साक्ष देतात. तसेच एकमेव ब्रह्मदेशाचा अपवाद वगळला तर भारतातील ब्रिटिश साम्राज्यापेक्षाही सम्राट अशोकाचे साम्राज्य विस्तृत स्वरूपाचे होते. ब्रिटिश काळात आणि आजच्या काळात आधुनिक साधनसामुग्री, अद्ययावत दळणवळण साधने असलेल्या काळातही सामाजिक स्वास्थ्य व उपाययोजनांना किती अडथळे येतात, किती कष्टप्रद होऊन बसते. या पार्श्वभूमीवर विचार केला तर एवढ्या अफाट साम्राज्याची सुरक्षा व स्वास्थ्य कसे राखले जात असेल, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. याकरीता साम्राज्याचे विविध भाग पाडून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांमार्फत कारभार

पाहिला जाई. चंद्रगुप्त मौर्याच्याच राज्यपद्धतीचा स्वीकार सम्राट अशोकाने केला असला तरी काही मूलभूत बदल अशोकाने केले होते. कारण चंद्रगुप्ताची राज्यपद्धती ही राजशक्तीवर आधारलेली होती तर अशोकाची राज्यपद्धती ही धर्मशक्तीवर म्हणजेच नैतिकशक्तीवर अधिष्ठित झालेली होती. म्हणजेच सम्राट अशोकाला साम्राज्य विस्ताराबरोबरच धर्म राज्याची स्थापना आणि संघटन घडवून आणावयाचे होते. साम्राज्याच्या चार भागाचे नियमन जरी चार मोठ्या अधिकाऱ्यांमार्फत केले जात असले तरी कायदे बनवून साम्राज्याचे नियमन स्वतः सम्राटच करीत असे. याकरिता सम्राटाला सहाय्य करण्यासाठी अनेक महत्त्वाच्या अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या होत्या. राजुक, प्रादेशिक, युक्त, आयुक्त या अधिकाऱ्यांबरोबरच सम्राट अशोकाने 'धर्म महामात्र' हे विशेष अधिकारी पद निर्माण केले होते. अशोकाच्या धर्माज्ञा जनतेला समजावून सांगणे आणि त्यांचे पालन होते किंवा नाही याची पाहणी करणे ही कर्तव्य 'धर्ममहामात्र' ची होती. यात जाति विशेषाला महत्त्व न देता व्यक्तीच्या गुणविशेषांना महत्त्व दिले जात असे. विशेष म्हणजे यात स्त्री अधिकाऱ्यांचाही समावेश करण्यात आला येत असे.[5] आरमार, रसद, पायदळ, घोडेस्वार, रथ, हत्तीदळ अशी सहा दळे निर्माण असलेले सम्राट अशोकाचे लष्करी बळ हे सामर्थ्यशाली असले तरी शिक्षणविषयक असलेल्या धर्म खात्याचा त्याला जास्त अभिमान होता. कारण शिक्षण घेऊन सर्वंकष जाणिवांनी परिपूर्ण समाज त्याला घडवायचा होता. म्हणूनच त्याच्या कोणत्याच शिलालेखात लष्करासंबंधीचा उल्लेख आलेला नाही.

### 2) रयतेचा त्राता :–

या काळात जमीन ही सरकारी मालकीची असे. शेतकरी ही सरकारची कुळे म्हणून जमिनी कसत आणि खंड म्हणून उत्पन्नाचा चौथा किंवा सहावा हिस्सा ठरल्याप्रमाणे सरकारात भरणा करीत. याशिवाय पाणीपट्टी सरकारला द्यावी लागत असे. असे असले तरी आजप्रमाणे हालाखीची स्थिती त्यावेळी शेतकऱ्यांची नव्हती. रयत फारच संतुष्ट, सुखी व संपन्न असल्याची नोंद मेगॅस्थेनीस करतो. कारण पाटबंधारे योजनेतून शेतीला पाणीपुरवठा मुबलक व वेळेवर केला जाई. मोठे सरोवरे व कालव्यांमार्फत सर्व प्रदेशांना पाणीपुरवठा केला जाई. सुयोग्य नियोजनाकरिता देशी–परदेशी निष्णात अभियंत्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या होत्या.

जिंकलेल्या प्रदेशातील जनतेलाही पुढील काळात पितृत्वाची वागणूक दिली जात असे. कैद्यांनासुद्धा दयेनच वागविण्याच्या आज्ञा होत्या. अनाथ, पोरके, गरजूंना सरकारातून सर्व प्रकारची मदत केली जाई. राज्यात व्यापार, कला, उद्योगधंदे यांची वृद्धी होण्याकरिता 'निकाय' नावाच्या अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केलेल्या होत्या. म्हणूनच अशोककालीन भारताने स्थापत्य व शिल्पकलेतील केलेली प्रगती पाहून जगालाही आश्चर्यचकित व्हावे लागले. 'शुल्कनिकाय' अधिकाऱ्यांमार्फत जकात खात्याचे नियमन करून त्यात सुसूत्रता आणली होती.

सम्राट अशोकाने रयतेच्या आरोग्याबाबत अतिदक्षता बाळगल्याचे दिसते. कोणीही औषधोपचार आणि शस्त्रक्रियेशिवाय राहू नये अशी त्याची इच्छा होती. माणसांबरोबरच पशुपक्ष्यांसाठीही रुग्णालये काढून आरोग्याच्या सुविधा सज्ज ठेवलेल्या होत्या. माझी प्रजा मला माझ्या मुलांसारखी आहे, मी माझ्या पुत्रांचे ऐहिक व पारलौकिक कल्याणासाठी झटणे हेही मी माझे कर्तव्य समजतो.[6] असे महत्त्वपूर्ण उल्लेख त्यांच्या शिलालेखातून वाचावयास मिळतात.

### 3) शिक्षणाचा प्रसार मूलभूत कार्य :–

रयतेच्या सर्वांगीन उन्नतीचे मूळ हे शिक्षण आहे, हे सम्राट अशोकाने जाणले होते. सार्वत्रिक शिक्षणाचे प्रधान अंग म्हणजे धर्म व नीती यांचेविषयीचे शिक्षण होते. कारण धर्म व नीती यांच्यामुळेच शीलवान समाज निर्माण होत असतो. 'शीलसंपन्नता हा राष्ट्रोन्नतीचा मूळ पाया आहे, धन आहे, उत्साह आहे, सत्ता आहे, पण शील नाही तेथे राष्ट्रशक्ती कधी निर्माण व्हायची नाही. व्यक्तिगत काय किंवा समाजात काय शील हेच बल असते. यासाठी राष्ट्रोन्नती करू इच्छिणाऱ्यांनी प्रथम शील संवर्धनाकडे लक्ष दिले पाहिजे.' हे लक्षात घेऊन सम्राट अशोकाने धर्म व नीती या शिक्षणप्रसाराचा अचाट प्रयोग केला. मोठ्याप्रमाणात पैसा खर्च केला. त्यात मोठे यशही मिळाले आणि यातून मगध साम्राज्याची प्रचंड भरभराट झाली. धर्म व नीती शिक्षण देण्याकरिता अशोक काळात नालंदा आणि तक्षशिला येथे जागतिक कीर्तीची विद्यापीठे होती. येथे विद्यार्थ्यांच्या निवास आणि भोजनाची व्यवस्था होती. शास्त्रे, कला, विद्या असे विषय या ठिकाणी शिकविले जात.[7]

## 4) आदर्श समाजजीवन :—

सम्राट अशोकाच्या उदात्त शैक्षणिक धोरणाचा परिपाक म्हणजे समाजात साक्षरतेचे प्रमाण हे अधिक होते. विविध सण, समारंभ, उत्सव साजरा केले जात असत. आहार—विहार उत्कृष्ट असल्याने समाज सुखी, संपन्न होता. समाजाची दृष्टी ही विशाल आणि उदार होती. सम्राट अशोकाने जरी बौद्धधम्माचा स्वीकार केला असला तरी इतर धर्मांचा अनादर केला नाही.[8] सर्वच धर्मातील आदर्श आणि चांगल्या गोष्टींबद्दल त्याला आदर असल्यामुळेच त्यांची धर्मनिरपेक्षता ही विशाल आणि व्यापक होती.

इतर राज्यांच्या काळापेक्षा अशोककालीन स्त्रीजीवन अधिक समृद्ध होते. स्त्री—पुरुष संन्यासी धर्मापेक्षा सामाजिक सेवेत व्रत घेत असत. स्त्रियांच्या उत्थानासाठी 'महापात्रा' या स्त्री अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती. स्त्रियांना आपल्या मर्जीप्रमाणे जीवन जगण्याचा अधिकार होता. म्हणूनच कुमारी संघमित्रा संसार त्याग करून भिक्षुणी बनली होती. विहिरी, रस्ते, धर्मशाळा काढून जनतेला अधिकाधिक सुखसोयी प्रदान केल्या.[9] आसाम राज्यात सर्वत्र पाली भाषा बोलली जात असावी. कारण सर्वच शिलालेख आणि स्तंभालेख हे पालीमध्येच आहेत. सम्राट अशोक हा जाणता वैज्ञानिक दृष्टिकोन असलेला राज्यकर्ता होता. म्हणूनच समाजाचे नेतृत्व ब्राह्मण वर्गाकडे नव्हते.

## सारांश :—

सर्व विरोधकांचा विरोध मोडून मगध साम्राज्यावर आपले वर्चस्व निर्माण करणारा अशोक स्वाभाविक शूर, महापराक्रमी, मुत्सद्दी व ज्ञानी होता. म्हणूनच आपल्या साम्राज्याचा अफाट विस्तार त्याने घडवून आणला. सज्ज प्रशासनाद्वारे अफाट साम्राज्यात शांतता सुबत्ता निर्माण केली होती. जनतेला पितृत्वाची वागणूक दिल्यामुळे अशोकाविरुद्ध बंडाळ्या होऊन साम्राज्यद्रोह झाला नाही. कारण जिंकलेल्या शत्रू राज्यातील जनतेलाही मुलांप्रमाणेच वागणूक दिली. कलिंग विजयाने मात्र त्याच्या जीवनात परिवर्तन होऊन त्याने तथागतांचा धम्म स्वीकारला. साम्राज्यात शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणलेत. प्रजाबद्दल राज्यकर्ता म्हणून धर्म आणि नितीच्या शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करून शीलसंवर्धन करणारा समाज निर्माण केला. प्रचंड लष्करी सामर्थ्य असतानाही शिक्षणावरच भर दिला. साम्राज्यात व्यापार, कला, विविध उद्योगधंद्याना वाव देऊन आर्थिक संपन्नता प्राप्त करून दिली. रयतेच्या आरोग्य सुविधांकडे जातीने लक्ष दिले. समाजजीवनात स्त्रीस्वातंत्र्याचा संकोच न होऊ देता वैज्ञानिकतेचा आग्रह धरला.

थोडक्यात सम्राट अशोकाला भारताचा पहिला चक्रवर्ती सम्राट म्हणणे उचित ठरेल. त्याचे कार्य, राज्यकारभार, विस्तार, सुबत्ता, संपन्नता, शांतता, शैक्षणिक—सामाजिक उत्थानाची वाटचाल पाहिली तर ते स्वाभाविकपणे सिद्ध होते. हेच व्हिन्सेंट स्मिथसारख्या पाश्चात्त्य इतिहासकारांनी सुद्धा मान्य केले आहे.

## संदर्भ :—


1. नवलखे धीरज, ***देवनांप्रिय प्रियदर्शी अर्थात सम्राट अशोक,*** सरिता प्रकाशन, पुणे, 2014, पृ. 14
2. भालेराव श्रीनिवास, ***प्रजापिता सम्राट अशोक,*** अशोक प्रकाशन, पुणे, 2010, पृ. 47—48.
3. मेधनकर डॉ. भदन्त सावंगी, ***भारतीय इतिहास के निर्माता सम्राट अशोक***, बुद्धभूमि प्रकाशन, कामठी रोड, नागपूर, 2009, पृ. 46—47
4. शिरगावकर डॉ. शरावती (अनु.) ***(रोमिला थापर यांच्या अशोक आणि मौर्यांचा ऱ्हास,*** *As'ok and The Decline of Mourya's* ***या पुस्तकाचा अनुवाद)*** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 2008, पृ. 204—205
5. आपटे वासुदेव गोविंद, ***सम्राट अशोक चरित्र,*** वरदा प्रकाशन, पुणे, 2011, पृ. 147—148
6. ***तत्रैव,*** पृ. 152, 153
7. ***तत्रैव,*** पृ. 154—155
8. तिरपुडे डॉ. हेमंत, ***भारत राष्ट्र के सम्राट अशोक मौर्य***, आशिया के प्रथम लिखित संविधान के शिल्पकार, पृ. 14
9. भालेराव श्रीनिवास, ***उपरोक्त क्र. 2,*** पृ. 58—59



प्रा. डॉ. संजीव पगारे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मेराणे, ता.जि.धुळे.